**स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) प्रथम बैठक दि. १५/०७/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता, मा. जिल्हाधिकारी साहेब, धुळे, यांच्या दालनात, झालेल्या स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाच्या बैठकिचे इतिवृत्त.**

---

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाचा शासन निर्णय क्र. NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८. अन्वये प्रदूषित नदी पटटयातील प्रदूषण रोखण्याकरीता धुळे जिल्हयासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) ची स्थापना करण्यात आली. सदर स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) ची प्रथम बैठक दि. १५/०७/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता, मा. जिल्हाधिकारी साहेब, धुळे यांच्या सातपुडा सभा गृह येथे घेण्यात आली.

सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, धुळे हे प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ नाशिक, यांचे प्रतिनिधी म्हणून स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल या बैठकिचे समन्वयक होत्या. मा. जिल्हाधिकारी साहेब धुळे, यांच्या अनुमतीने दि. १५/०७/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाच्या प्रथम बैठकीस सुरूवात झाली.

सौ. सौजन्या सु. पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, धुळे हे प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ नाशिक, यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थितांचे स्वागत करून स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) बैठकीचे उददीष्टे व कामकाज या बददल तसेच सदर सनियंत्रण दलाची प्रस्तावना केली.

**सौ. सौजन्या सु. पाटील:**- उप- प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि.मंडळ, धुळे हे प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ नाशिक यांचे प्रतिनिधी :- यांनी सांगीतले की देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत दिनांक १७.१.२०१८ रोजी दैनिक द हिंदू मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताच्या अनुशंघाने मा राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करून घेण्यात आले होता मा. हरित लवादाने सदर प्रकरणी दिनांक २०.०९.२०१८ रोजी आदेश पारित करतांना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्ट्यांचे वर्गीकरण प्राधान्य क्रमांक १ ते ५ प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्ट्यांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयां मधील ९ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्रमांक १ , ६ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्रमांक २, १४ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्रमांक ३ , १० प्रदूषित पट्टे प्राधान्य क्रमांक ४ व १४ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्रमांक ५ मध्ये समाविष्ट आहेत.

धुळे जिल्हयामधील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे वर्गीकरण खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | नदीचे नाव | प्रदूषीत पट्टे | प्रदूषित पट्ट्यांचे वर्गीकरण प्राधान्य क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | तापी नदी | बेटावद ते कोपर्ली | प्राधान्य क्रमांक -३ |
| २. | कन नदी | कावठे ते साक्री | प्राधान्य क्रमांक - ५ |
| ३. | पाझरा नदी | वरखेडी ते धुळे | प्राधान्य क्रमांक - ५ |

वरील सर्व नदीच्या काठावर कोणताही उद्योग कार्यान्वीत नाही, त्यामुळे नदीमध्ये औद्योगिक सांडपाण्याचा निचरा होत नाही असेही त्यानी सांगितले. तसेच मुख्यतहा नदी प्रवाहामध्ये विना प्रक्रीया घरगूती सांडपाणी मिसळत असल्यामुळे नदीचे प्रदूषण होण्याचे हे एक कारण आहे.

**मा. जिल्हाधिकारी साहेब:-** सदर प्रदूषित पटटयाचे वर्गीकरण केल्याचा काय आधार असे विचारले.

**सौ. सौजन्या सु. पाटील:-** केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांनी संप्टेबर २०१८ रोजी River Stretches for Restoration of Water Quality (State wise and Priority wise) या पुस्तीकेमध्ये तापी नदी, कान नदी, पाझरा नदी, या नदया चे प्रदूषित पटटे असल्याचे नमुद केलेले आहे असे सांगितले.

**मा. जिल्हाधिकारी साहेब:-** यांनी सौजन्या सु. पाटील यांना विचारले की, जर मुख्यतहा नदी प्रवाहामध्ये विना प्रक्रीया घरगूती सांडपाणी मिसळत असल्यामुळे नदीचे प्रदूषण होत आहे तर मग धुळे जिल्हयाच्या नदीच्या पात्रात **(Upstream)** वरील भागातून किंवा कंपन्याचे प्रदूषित पाणी मिसळते का याची विचारणा केली.

**सौ. सौजन्या सु. पाटील:-** धुळे जिल्हयातील नदी किना-याची पाहणी केली असता कुठेही औद्योगिक सांडपाणी सोडले जात नाही किंवा नदीत मिसळले जात नसल्या बाबतचे सांगितले.

**सौ. सौजन्या सु. पाटील:-** यांनी मा. हरीत लवाद नवी दिल्ली यांचा ३१ पानाचा आदेश दाखवून त्या मधील धुळे जिल्हयामधील नदी प्रदूषित पटटये प्राधान्य क्र. ३ व ५ वर असल्या बाबतची माहिती पृष्ठ क्र. २४ व पृष्ठ क्र. २५ मध्ये नमुद असल्याचे तसेच पृष्ठ क्र. १४ ते १६ मधील नमुद बाबी बददल सांगितले.

**सौ. सौजन्या सु. पाटील:-** यांनी सांगीतले की, धुळे शहरातून निर्माण झालेले घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया मोती नाल्याव्दारे थेट पांझरा नदी पात्रात सोडले जाते त्यामुळे देखील पाझरा नदी ही दुषित होते.

**मा. जिल्हाधिकारी साहेब:-** धुळे शहरातून निर्माण झालेले घरगुती सांडपाणी यावर महानगरपालिकेचे **STP** बसविण्याचे काम प्रगतिपथावर चालू असल्याचे सांगितले.

**मा. जिल्हाधिकारी साहेब:-** यांनी नदी प्रदूषित पटटयामध्ये उत्खनन होणार नाही याची खबरदारी जिल्हा खानीकर्म अधिकारी तसचे पोलीस विभागाने घ्यावी असे आदेशीत केले व गुन्हेगारास पकडून **IPC** - २७७ नुसार कारवाई करावी अशी सुचना दिली.

**मा. जिल्हाधिकारी साहेब:-** सौ. शिरसाठ यांना सर्व ग्रामसेवकाना गावात किती शोषखडडे, घरगुती सांडपाणी वाहून नेना-या नलीका, घरोघरी जावून ओला व कोरडा कचरा जमा करण्यासाठी लागणा-या सदया असलेल्या सुवीधा व आधिकच्या सुविधा काय आवश्यक आहेत या बददल पुढील बैठकिमध्ये पुढील प्रस्ताव घेवून येण्याबददल आदेशित केले आहे.

**मा. तडवी :-** नदीच्या किनारी, नदीमध्ये घन कचरा, जैवीक कचरा, चिकन विक्रेते, मटन विक्रेते यांच्या कडून अशा प्रकारचा कचरा नदीत टाकतात का त्या बददल एक स्वतंत्र पथक नेमून त्याच्यावर लक्ष ठेवून गुन्हेगारास पकडून कारवाई करण्याचे आदेशित केले आहे. जेणे करून नदीचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

**मा. तडवी :-** सर्व ग्रामपंचायतचे ग्रामसेवक, नगरपालिकेचे मुख्यधिकारी, आणि महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या मदतीने पथक स्थापन करण्याबाबतचे आदेश दिले. नदीमध्ये घन कचरा, जैवीक कचरा, टाकणा-या लोकांवर कारवाई करणे यासाठी सदर पथकाने काम करावयाचे असे आदेशीत केले, तसेच शोषखडडे उभारण्यासाठी व बंद गटारी उभारण्यासाठी लागनारा खर्च व त्याची भौगोलिक स्थिती याबददलचा सविस्तर अहवाल तयार करून पुढील बैठकीमध्ये मा. जिल्हाधिका-यांना सादर करण्याबाबतचे आदेशीत केले.

**मा. बागुल :-** यांनी नदीप्रदूषण रोखण्यासाठी फायटोरिड टेक्नोलॉजीचा वापर करणे योग्य राहिल असे सुचवीले. त्यामध्ये मा. जिल्हाधिकारी साहेबांनी संमती दर्शवली जेणे करून नदी प्रदूषण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची प्रथम बैठक मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या अनुमतीने संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| **(सौजन्या सु. पाटील)** | **(राहूल रेखावार)** |
| सदस्य, | सदस्य, |
| उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे. | (स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल) |
| तथा | तथा |
| प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांचे प्रतिनिधी, | जिल्हा दंडाधिकारी, धुळे. |

# प्रेस नोट

**विषय:**- प्रेस नोट बाबत..

**संदर्भ:**- १) मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या सातपुडा सभा गृह येथे झालेल्या स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची प्रथम बैठक दि. १५/०७/२०१९.

२) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

मा. जिल्हाधिकारी साहेब, धुळे, यांच्या सातपुडा सभा गृह येथे झालेल्या स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची प्रथम बैठक दि. १५/०७/२०१९ रोजी संपन्न झाली. सदर बैठकी दरम्यान मा. जिल्हा न्यायाधीश, मा. जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी व प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नाशिक त्यांचे प्रतिनिधी तसेच विषेश आंमत्रित सदस्य म्हणून मुख्याधिकारी शिरपूर नगर परिषद शिरपूर हे सदर बैठकीस हजर होते.

मा. जिल्हाधिकारी साहेब, यांनी बैठकीमध्ये संबंधीत मुख्याधिकारी, नगरपरिषदा यांनी बंदीस्त गटारी व्दारे गावातून निघणारे घरगुती सांडपाण्यावर एकत्रितरीत्या जमा करून त्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रीया केंद्रे उभारून लवकरात लवकर कार्यान्वीत करावे, या मध्ये गावातील लोकांनी देखील सहकार्य करावे, अशा सुचना देण्यात आल्या. प्रदुषित नदयांच्या पटटयातील प्रदूषण कमी करण्याकरीता संबंधीत नगरपंचायत, महानगरपालिका यांना स्वतंत्र पथक नेमून दिले आहे. हे पथक कधीही धाड टाकून दंडात्मक कार्यवाही करू शकते. सर्व ग्रामपंचायत यांनी नदी स्वच्छतेची मोहीम घेणे व नदीपात्रात कचरा होणार नाही यांची खबरदारी घ्यावी. सदरील स्वच्छता मोहिमेला जनजागृतीचे स्वरूप देण्यात यावे. तसेच नदीपात्रात कचरा टाकतांना आढळल्यास कचरा टाकणा-यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबतचे आदेशित केले.

तसेच कृती आराखडा तयार करतांना प्रदूषणाचे घटक निश्चित करणे यामध्ये **STP/ETP** ची सदय:स्थिती /**Functioning** घनकचरा व्यवस्थापन निर्माण होणा-या कच-याची **Quantity**, त्यावरील प्रक्रिया, घनकच-याची गुणवत्ता, प्रदूषित पटटयांमध्ये **Catchment** मध्ये निर्माण होणारे सांडपाणी या सर्व बाबींचा समावेश करण्यात यावा, या बाबत आदेशित करण्यात आले.

नदी प्रदूषित पटटयामध्ये उत्खनन होणार नाही याची खबरदारी संबंधीत विभागाने घ्यावी.

4P
17/07/19